**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.91/2022**
**भिमराव पाटील वि. निर्मलाबाई पाटील**

# निशाणी 01 खालील आदेश

**( पारीत दिनांक 29/07/2024 )**

1. सदर अर्जाद्वारे अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केलेली आहे.

2. अर्जदार क्र. 1 ते 4, तसेच सामनेवालीचे वडील **मयत पुंडलिक आनंदा पाटील** दि. 04/06/2003 रोजी मौजे पेंडगांव ता.भडगांव जि.जळगांव येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदारांची आई हया देखील दि. 31/10/2002 रोजी मौजे पेंडगांव ता. भडगांव जि. जळगांव येथे मयत झालेले आहे. तसेच **मयत पुंडलिक आनंदा पाटील** याचे अर्जदार व सामनेवाली यांचे शिवाय कोणीही वारस नाही.

3. सामनेवालीस नोटीस तामिल होउनही ती हजर झाली नाही त्यामुळे तिच्या विरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश दिनांक 06.01.2024 रोजी पारीत करण्यात आला.

4. सरकार दप्तरी **मयत पुंडलिक आनंदा पाटील** यांच्या नावे मौजे पेंडगांव ग्राम पंचायत हददीतील घर मिळकत ग्राम पंचायत मालमत्ता नं. 141 या घरमिळकतीस अर्जदार व सामनेवाली यांचे नाव लावणे करीता **मयत पुंडलिक आनंदा पाटील** यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून अर्जदार व सामनेवाली यांना प्रस्तुत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

5. सदर अर्जात नमूद हकिकत संदर्भात इतर ति–हाईत पक्षांची हरकत आहे किंवा नाही याची पडताळणी होणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला होता. तसे वर्तमानपत्र नि. 11 यादी सोबत सादर करण्यात आले आहे. विहीत कालावधीत कोणत्याही ति–हाईत पक्षाची प्रस्तुत अर्जाकामी हरकत असल्याचे दिसून आलेले नाही.

6. सबब, अर्जदार क्र. 3 चे पुराव्याचे शपथपत्र निशाणी 11, तसेच अर्जदाराचे साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी 14, **मयत पुंडलिक आनंदा पाटील हयांचे मृत्यु प्रमाणपत्र, मयत इंदुबाई पुंडलिक पाटील याचे मृत्यु प्रमाणपत्र, मयत पुंडलिक आनंदा पाटील याचे नावे असलेला नमुना नं. 8, अर्जदार याचे आधार कार्डाची व्हेरीफाईड प्रती** निशाणी 03 यादीसोबत दाखल करून पुरसिस नि.15 अन्वये त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

7. या पार्श्वभूमीवर, अर्जदारपक्षाचे युक्तीवाद ऐकला. तसेच, वर्णन यादी नि.3 सोबत दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. ज्याअर्थी कोणत्याही ति–हाईत पक्षाने विहीत कालावधीत प्रस्तुत अर्जाकामी हरकत नोंदविली नाही, अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्रात शपथेवर नमूद केलेल्या हकिकत संदर्भात त्यांची कोणतीही उलटतपासणी झालेली नाही, त्याअर्थी, अर्जदार यांची बहुतांशी हकिकत अबाधित राहिलेली आहे.

8. सबब, **मयत पुंडलिक आनंदा पाटील** यांचे पश्चात अर्जदार 1 ते 4 व सामनेवाली हे त्यांचे वारस आहेत आणि त्याप्रमाणे ते वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत या निर्णयावर येवुन खालील प्रमाणे आदेश करण्यात येतो–

**आदेश**

1) प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

2) **अर्जदार क. 1 भिमराव पुंडलिक पाटील, अर्जदार क. 2 सुशिलाबाई भ्र. सुरेश पाटील, अर्जदार क. 3 राजेंद्र पुंडलिक पाटील, अर्जदार क. 4 कैलास पुंडलिक पाटील तसेच सामनेवाली निर्मलाबाई भ्र. नाना पाटील यांना मयत पुंडलिक आनंदा पाटील ,** यांचे कायदेशीर वारस घोषित करण्यात येत असून त्यांनी योग्य ती कोर्ट फि भरल्यास वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

3) सदरचा वारस दाखला अर्जामधील नमुद कारणाकरिताच मर्यादीत उपयोग करण्याचा आहे.

4) येणेप्रमाणे सदर अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

सहि/

**( श्रीमती. वैशाली सं.मोरे )**

**दिनांक : 29/07/2024** **दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, भडगांव**